# तिफण

वर्ष : १४ वे । अंक ४ था

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च - २०२३

ISSN 2231-573X

UGC Care Listed Journal




# यशवंतराव चव्हाण

## विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १४ वे, अंक - ४ था

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

भाग - १

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

◆ संपादक ◆

**डॉ. शिवाजी हुसे**

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी,हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३, मो. ९९०४००३९९८

**UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X**

**साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक**

# तिफण

**MAH MAR 34737/13/2009 - TC**

वर्ष १४ वे, अंक - ४ था जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

## यशवंतराव चव्हाण विशेषांक

◆ संपादक ◆

**डॉ. शिवाजी हुसे**

◆ अतिथि संपादक ◆

**प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे**

**डॉ. राजकुमार मरे**

◆ **संपादक मंडळ** ◆

| | | |
|---|---|---|
| डॉ. सर्जेराव जिगे | डॉ. ताहेर पठाण | डॉ. दिलिप बिरुटे |
| डॉ. सुभाष बागल | डॉ. रामचंद्र झाडे | डॉ. दत्तात्रय डुंबरे |
| डॉ. सुभाष शेकडे | डॉ. सुखदेव इगारे | डॉ. प्रेमला मुखेडकर |
| डॉ. राजकुमार मुसणे | डॉ. सुधाकर जाधव | डॉ. रंजना कदम |

**मूल्य : २५० रुपये**

या अंकातील लेखकांच्या संपादक सहमत असतीलच असे नाही, या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

**पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३, मो. ९९०४००३९९८**

## भाग - १ अनुक्रमणिका



| अनु क्र. | लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | राजकारणा पलीकडचे यशवंतराव ....<br>**डॉ. संदीप भगवान वाकडे** | ६३-६७ |
| १४ | यशवंतराव चव्हाण : सुसंस्कृत राजकारणाचा वसा व वारसा<br>**डॉ. शरद बाबुराव सोनवणे** | ६८-७३ |
| १५ | महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीतील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान<br>**सौ. कविता विजय कुपवाडे** | ७४-७८ |
| १६ | यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल<br>**प्रा. डॉ. संजय सागरू सपकाळ** | ७९-८३ |
| १७ | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य<br>**प्रा. डॉ. संजीव सुखलाल बोडखे** | ८४-८८ |
| १८ | यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल<br>**डॉ. विष्णू राणबा पाटील** | ८९-९२ |
| १९ | प्रभावी वक्ते साहित्य आणि सांस्कृतिचे गाढे अभ्यासक : यशवंतराव चव्हाण<br>**प्रा. परमेश्वर सिद्राम हटकर** | ९३-९७ |
| २० | थबथबलेले रसिकत्व : यशवंतराव चव्हाण<br>**प्रा. दिलीप ज्ञानांगाराव भिसे** | ९८-१०३ |
| २१ | यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य<br>**किशोर कैलास बांबर्डे**<br>**प्रा. डॉ. आघाव एन. बी.** | १०४-१०८ |
| २२ | यशवंतराव चव्हाण - अस्पृश्य व नवदीक्षित बौद्धविषयीचे विचार व कार्य<br>**नील जनार्धन नागभिडे**<br>**प्रा. डॉ. विष्णू बब्रुवान वाघमारे** | १०९-११७ |
| २३ | यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक राजकीय कार्याचा आढावा<br>**प्रा. कु. पल्लवी रमेशराव देशमुख** | ११८-१२० |
| २४ | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विकासातील योगदान<br>**अभिषेक सुभाषराव तांबे**<br>**डॉ. सुनिल अण्णा गोरडे** | १२१-१२४ |



# २४. यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विकासातील योगदान

**अभिषेक सुभाषराव तांबे**
संशोधक विद्यार्थी
**डॉ. सुनिल अण्णा गोरडे**
संशोधक मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, कन्नड.

**प्रस्तावना**

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी राज्याच्या कृषी, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक विकासाला योग्य दिशा दिली. केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षण मंत्री, परराष्ट्र मंत्री, विरोधी पक्षनेते तसेच केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्ष अशा अनेक महत्त्वाच्या पदावर काम करत असताना यशवंतरावांनी आपले कर्तृत्व वेळोवेळी सिद्ध केले आहे. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला. देशाचे उपपंतप्रधान हे अत्यंत महत्त्वाचे पद केवळ कर्तृत्वाच्या जोरावर त्यांना मिळालं आणि त्यांनी त्या पदाचा सन्मान वाढवला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे ध्येय पूर्ण केल्यानंतर प्रगतिशील महाराष्ट्र घडवण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. मुंबई, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ अशा भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधता असलेल्या राज्यांना एका सूत्रात बांधण्याचे काम केलं. यशवंतराव चव्हाणांच्या मते, व्यक्तीच्या विकासाचे मुख्य साधन शिक्षण आहे. शिक्षणामुळे व्यक्ती, समाज व राष्ट्र यांची प्रगती होते. या शोधनिबंधामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासातील योगदानाचा आढावा घेतला आहे.

**उद्दिष्टे**

1. यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासातील योगदान अभ्यासणे.

**शिक्षणाविषयी यशवंतरावांची भूमिका**

शिक्षण हे व्यक्तीच्या विकासाचे मुख्य साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्ती, समाज व राष्ट्राची प्रगती होईल, असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. ते शिक्षणाकडे इंग्रजाप्रमाणे बळ म्हणून पाहत नव्हते किंवा वैदिकाप्रमाणे वर्चस्वाचे साधन म्हणून ही पाहत नव्हते. त्यांनी शिक्षणाचा विचार महात्मा फुले यांच्या विचारातून घेतला होता. विद्येचा संबंध त्यांनी मनुष्य असण्याशी जोडला होता. ज्ञानवंत होणे हा मुद्दा मनुष्याला पशूपासून वेगळा करतो व पशुचे रूपांतर मनुष्यात होते. या गोष्टी त्यांनी अधोरेखित केल्याचे दिसून येते. त्यांना शैक्षणिक सांस्कृतिक धार्मिक अशा विविध क्षेत्रात जातीय विषमता असल्याचे अनुभवाला आले. यशवंतराव चव्हाण यांना इच्छा असूनही संस्कृत भाषा शिकता आली नाही. यशवंतराव चव्हाण मागासवर्गीय वस्तीमध्ये शाळा चालवण्यासाठी शिक्षक म्हणून जात होते. सत्ता हातात आल्यानंतर त्यांनी साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना केली.

यशवंतराव चव्हाण यांच्या मते, 'महात्मा फुले यांचे विचार मूलगामी व नवीन दिशा दाखवणारे आहे. शेतकरी समाजाची होणारी पिळवणूक, शिक्षण क्षेत्रापासून वंचित ठेवलेला समाज यांचे प्रश्न सोडविलल्या खेरीज देशाचा विकास होणार नाही हा विचार माझ्या मनामध्ये ठसला आहे.'

**शिक्षणाची गरज**

शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणारे इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते या घटकाला यशवंतराव चव्हाण यांनी महत्त्व दिल्याचे दिसते. ग्रामीण शिक्षण व शहरी शिक्षण अशी शिक्षणाचे दोन मूलभूत प्रकार असूच शकत नाही. ग्रामीण शिक्षण हा काही वेगळा प्रकार आहे अशा समजुतीने जर आम्ही शिक्षणाकडे पाहत असू तर आपली मोठी चूक होईल असे त्यांचे मत होते.

**शिक्षणाच्या साहाय्याने इतर क्षेत्राच्या विकासास हातभार**

यशवंतराव चव्हाण यांच्या मते, केवळ कृषी क्षेत्रावर अवलंबून राहून आपला व देशाचा विकास होणार नाही. त्यासाठी कृषी क्षेत्राबरोबरच औद्योगिक क्षेत्र, ऊर्जा क्षेत्र व इतरही क्षेत्रात आपणांस शिक्षणाचा उपयोग करून घेता येईल. त्या क्षेत्रांस शिक्षणाची जोड देऊन शिक्षणातून प्राप्त कौशल्य, ज्ञान तसेच विज्ञान व तंत्रज्ञान, संशोधन वृत्ती यांच्या साहाय्याने नवनवीन प्रयोग अनुसरून त्या क्षेत्रात लक्षियत, प्रगतिशील वृद्धी घडवून आणणारे बदल घडवून आणता येतील. शहरांप्रमाणे खेडे सुद्धा दीपमान व प्रकाशित होणे गरजेचे आहे आणि त्यासाठी शिक्षणाने सुपीक झालेल्या बुद्धीचा उपयोग झाला पाहिजे. निश्चितच शिक्षणाच्या साहाय्याने ग्रामीण जीवन आणि नागरी जीवन, खेड्यांतील जीवन आणि शहरांतील जीवन यांच्या मधले वाढते अंतर कमी होण्यास मदत होईल. यशवंतराव चव्हाण यांच्या मते, 'केवळ शेतीवर आधारलेला देश आर्थिक दृष्टीने संपन्न होत नाही. सामर्थ्य संपन्न व समृद्ध देश करावयाचा आहे. त्याकरता औद्योगिक शक्ती वाढली पाहिजे. खेड्यापाड्यात विजेचा वापर झाला पाहिजे. शेती सोबत लहान उद्योग वाढून खेड्याची शक्ती आणि ज्ञान विकसित झाले पाहिजे पण सोबतच त्यांच्या शिक्षणाचा विकास झाला पाहिजे त्यांच्यातील अज्ञान घालवले पाहिजे हे महत्त्वाचे बदल आणण्याकरता पहिल्या दोन पंचवार्षिक योजना झाल्या असूनही शेतकऱ्यांना त्यांच्या खरोखर फायदा झाला नाही. शेती सुधारली नाही तर काहीच होणार नाही, त्याकरता शेतकऱ्यांना त्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळाले पाहिजे त्यांना अडाणी ठेवून त्यांचा विकास होणार नाही. नवा विचार नवा माणूस निर्माण केल्याशिवाय काहीच साधणार नाही. जगातील विकसित देशाच्या अनुभवावरून शेतीबरोबरच उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास झाला पाहिजे हा यशवंतराव चव्हाण यांचा विचार महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते.

**संतुलित विकास**

महाराष्ट्रातील विदर्भ, कोकण, मराठवाडा आणि इतर कोणताही विभाग असोत त्यांच्यात बंधू-भावाची भावना नेहमी जीवंत असली पाहिजे. विदर्भ, कोकण, मराठवाड वा महाराष्ट्रातील कोणताही विभाग असो या प्रदेशांचा संतुलित विकास झाला पाहिजे.

कोणत्याही विभागास, प्रदेशास भेदभावाची वागणूक मिळता कामा नये. याबाबत यशवंतराव चव्हाण नेहमीच आग्रही होते. शिक्षणातून समतोल विकास होण्यास मदत होत असल्याचे दिसून येते.

**शैक्षणिक संस्था व विद्यापीठांची उभारणी**

यशवंतराव यांनी शिक्षणासाठी आपले मुख्यमंत्रीपद पणाला लावले होते. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था यांच्या स्थापनेसाठी आणि विकासासाठी यशवंतराव चव्हाण यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. या संस्थांचे कार्यक्षेत्रच मुख्य शहराच्या बाहेर होते. त्यामुळे ग्रामीण भागात शिक्षण जाण्यासाठी मदत झाल्याचे दिसून येते. शिक्षणातून ग्रामीण भागामध्ये मानवता हा दृष्टिकोन तयार होईल अशा आशावाद निर्माण केला.

**कृषी शिक्षणासंबंधी मत**

शेती संबंधी जे नवनवीन संशोधन आजच्याघडीला होत आहे त्याचा उपयोग करून आपण आपली शेती करू शकू अशा दृष्टीने शिक्षण देण्याचा प्रयत्न आपणांस करता येईल. जुन्याच पद्धतीने अनेक शतके आपण शेती करत आलो. त्यामुळे शेतीच्या धंदा पाठीमागे पडला. आज शेतीचा संबंध नव्या शोधांशी, शेती करण्याच्या नव्या नव्या पद्धतीशी जोडायचा असेल तर हे नवे शास्त्र शेतीच्या जोडीला भिडवण्याचे काम आपण केले पाहिजे. या कामांमध्ये आम्हाला शिक्षणाचा उपयोग करून घेता येईल. नवीन तंत्रज्ञानावर आधारित शेतीला यशवंतराव चव्हाण यांनी प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.

**ई. बी. सी. साठी शुल्क-सवलत**

ई. बी. सी. साठी शुल्क सवलत योजना यशवंतराव चव्हाण यांनी सुरू केली. या योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत मिळाल्याचे दिसून येते. या योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील अनेक लोकांना शिक्षण घेता आले व या शिक्षणातून आपला व समाजाचा विकास करता आला. त्यामुळे या प्रवर्गातील शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदत झाल्याचे दिसून आले. रा. ना. चव्हाण यांच्या मते, 'सर्वसामान्य मराठ्यांना उच्चभ्रू मराठ्यांच्या पुढारीपणामुळे वाव नव्हता. गुणवत्तेच्या जोरावर पदवीधर मोठ्या दारिद्र्याच्या अवस्थेतून सर्वसामान्य मराठा कुटुंबातून ते पुढे आले होते. सर्वसामान्य लोकांविषयी त्यांना कळवळा होता. त्यामुळे फी माफीचा निर्णय त्यांच्या काळामध्ये झाल्याचा दिसून येतो. अनुदाने व शिक्षकांचे पगार देण्याचा उपक्रम चालू झाल्यामुळे शिक्षण संस्था वाढण्यास मदत झाल्याचे दिसून येते'.

**सैनिकी स्कूल ची स्थापना**

यशवंतराव चव्हाण यांनी सातारा येथे सैनिकी स्कूल ची स्थापना केली. या सैनिकी स्कूलच्या स्थापनेचा परिणाम म्हणजे सातारा जिल्ह्यातील काही गावांमधून भरती होण्याचे प्रमाण आजही मोठ्या प्रमाणात आहे. आज या सैनिकी स्कूल मधून बाहेर पडलेले अनेक कर्तबगार विद्यार्थ्यांनी तिन्ही संरक्षण दलामध्ये प्रभावीपणे काम केल्याच्या आढळून येते.

**नोकर पेशा मनोवृत्तीस विरोध**

आजपर्यंतच्या शिक्षणाने आमच्यात नोकर पेशा मनोवृत्ती निर्माण झाली आहे आमची बुद्धी, आमचा पिंड नोकरपेशाचा आहे असे आमच्यावर रुजविण्यात आले, ही गोष्ट त्यांना मंजूर नव्हती.

**मराठवाड्याच्या विकासाला प्राधान्य**

स्वातंत्र्यापूर्वी मराठवाडा हा भाग निजाम राजवटीत असल्यामुळे शैक्षणिक दृष्ट्या इतर विभागाच्या तुलनेत मागास राहिल्याचे आढळून येते. निजाम राजवटीमध्ये मराठवाड्यामध्ये आधुनिक शिक्षणाचा अभाव दिसून येतो. यशवंतराव चव्हाण यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची स्थापना मराठवाड्यामध्ये करून मराठवाड्याच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. विद्यापीठाच्या स्थापनेमुळे मराठवाड्यातील लोकांना आधुनिक शिक्षणाची उपलब्धता झाली.

**सारांश**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी कृषी, आर्थिक, औद्योगिक क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले आहे. शिक्षणाच्या सहाय्याने आपण केवळ नोकरी मिळू शकतो या नोकरशाही प्रवृत्तीस त्यांनी विरोध करून शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे मुख्य साधन आहे, हा विचार त्यांनी समाजामध्ये रुजवला. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाला शुल्क सवलत देऊन त्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तसेच कृषी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्रास शिक्षणाची जोड दिली तर त्या क्षेत्रात इच्छित, लक्षित प्रगती साधता येईल विचार मांडला. मराठवाड्यामध्ये त्यांनी स्थापन केलेल्या विद्यापीठामुळे आणि ई. बी. सी. सवलत योजनेमुळे त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानातून मराठवाड्यात विद्यापीठ उभारून, ई.बी.सी.शुल्क सवलत योजनेमुळे मराठवाड्याचा आणि महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास होण्यास मदत झाल्याचे दिसून येते. सत्ता हातात आल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षण हा मुद्दा पकडून शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली आणि बहुजन समाजाच्या चळवळीचे नेतृत्व केल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची**


1. मी पाहिलेले यशवंतराव, संपादिका डॉक्टर सरोजिनी बाबर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, 1988.
2. सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण, मुंबई.
3. युगांतर, यशवंतराव चव्हाण, पुणे, 1970.
4. यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण, चव्हाण रा. ना., पुणे, 2010.
5. उढाण उल्हास एकनाथराव, महाराष्ट्र टाइम्, प्रकाशित लेख, 16 मार्च 2014.
6. थोरले साहेब, डॉ. विजय पाथ्रीकर, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2010.
7. यशवंतराव चव्हाण: राजकारण आणि साहित्य, भोळे भास्कर लक्ष्मण, औरंगाबाद, 2007
8. यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व, संपादक भा.कृ. केळकर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ. मुंबई.1985.

MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण घेऊन निघालोय...



आयुष्याची लढाई लढताना
दुःख आणि यातनांचे
डोंगर पार करून मी चालत गेलो ही खडतर वाट
कुणी काटे पेरले वाटेत
तर काहींनी स्पीड ब्रेकर उभे केले
पावला पावलावर...
वैशाखी उन्हाच्या झळा सोसत
मी अनुभवलाय हरेकदा दुष्काळ दाह
मायबापांच्या कष्टाचा
पाढा वाचीत गेलो
आयुष्याची बेरीज-वजाबाकी समजून घेऊन...
जगण्याचं गणित सोपं व्हावं म्हणून
जायबंदी करून पायात
कोलदांडा घालण्याचे प्रयत्नही झालेत
नाही असे नाही...
नजरकैदेचा खडा पहाराही सोसावा लागला...
जगण्याच्या या अनामिक वाटेवर
कोणत्याही लाटेवर स्वार
व्हायला आवडलेच नाही मला
मला तोडायचे होते पिढ्यानपिढ्या
आमच्या पायात अडकवलेल्या
अमानुष, अन्यायी बेड्या
तोडायचे होते बलदंड, बेफाम बेलगामी
बेजबाबदार साखळदंड...
शब्दांनीच हाक देऊन उठवलं अन
पायात बळ भरलं चालण्याचं

मग मी चालत राहिलो अडखळत
कधी चाचपडत तर कधी सावध बेसावध
वाटा आडवाटा तुडवत
मी निघालोय प्रज्ञा सूर्याच्या दिशेनं...
इथल्या बिचेहऱ्यांच्या माणसांच्या
जगण्याला अर्थ प्राप्त व्हावा म्हणून
हे नांगरूप पडलेलं रान
वहिती करण्यासाठी एकवटून, एकजुटीने
तिफन घेऊन निघालोय मी
या उघड्या बोडक्या माळरानात
विचारांची पेरणी करून
एका दाण्याचे हजारो दाणे करण्यासाठी...

- शिवाजी हुसे